e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शनिवार दिनांक 01/11/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 254 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com



महापालिका सेवेतून 22 जण सेवानिवृत्त!

# भारताचा मोठा निर्णय, अमेरिकेबरोबर ऐतिहासिक करार!



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**दिल्ली : गेल्या काही महिन्यांपासून अमेरिका आणि भारतामधील व्यापारी संबंध ताणले गेलेले आहेत. कारण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर तब्बल ५० टक्के आयातशुल्क लादलं आहे.**

एवढंच नाही तर भारताने रशियाकडून तेल आयात करू नये म्हणून ट्रम्प सातत्याने भारतावर टीका करत आहेत.असं असतानाच आता एक महत्वाची बातमी समोर आली आहे. भारताने एक मोठा निर्णय घेतला असून अमेरिकेबरोबर एक ऐतिहासिक करार केला आहे. भारत आणि अमेरिकेमध्ये १० वर्षांचा संरक्षण करार झाला असून भारताचे संक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि अमेरिकेच्या संरक्षण सचिवांनी १० वर्षांच्या संरक्षण करारावर स्वाक्षरी केली आहे.अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी या संदर्भात एक्सवर (ट्विटर) पोस्ट केली आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटलं की, "भागीदारी वाढवण्याच्या दिशेने एक मोठं पाऊल उचलत शुक्रवारी अमेरिकेने भारताबरोबर १० वर्षांच्या संरक्षण आराखड्यावर स्वाक्षरी केली.

दोन्ही देशांचे संरक्षण संबंध याआधी कधीही इतके मजबूत नव्हते", असं पीट हेगसेथ यांनी म्हटलं आहे.अमेरिकेबरोबर १० वर्षांच्या ऐतिहासिक संरक्षण कराराच्या संदर्भात राजनाथ सिंह यांनी एक्सवर पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये राजनाथ सिंह म्हटलं की, "अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांच्याबरोबर माझी मलेशियात महत्वाची बैठक झाली. आम्ही १० वर्षांच्या अमेरिका-भारत प्रमुख संरक्षण भागीदारीसाठी आराखड्यावर स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे दोन्ही देशांत मजबूत संरक्षण भागीदारीत एक नवीन युग सुरू होईल", असं राजनाथ सिंह यांनी म्हंटल.

# शेतकऱ्यांना 30 जूनपर्यंत कर्जमाफी - मुख्यमंत्री



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यातील शेतकऱ्यांना ३० जून २०२६ पूर्वी कर्जमाफीचा निर्णय घेणार अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. "कर्जमाफीच्या अनुषंगाने एक समिती आम्ही गठीत केली आहे. एप्रिलपर्यंत या समितीने शिफारस करायची आहेत. त्या आधारावर पुढची प्रक्रिया करून तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्यात येईल" असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.**

सह्याद्री अतिथीगृह येथे शेतकरी कर्जमाफी संदर्भात आंदोलक प्रतिनिधी शिष्टमंडळ सोबत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार, शेतकरी आंदोलन शिष्टमंडळातील प्रतिनिधी माजी राज्यमंत्री ओमप्रकाश बच्चू कडू, खासदार राजू शेट्टी, माजी मंत्री महादेव जानकर, वामनराव चटप, रविकांत तुपकर, राजन क्षीरसागर, गिरीश दाभाडकर, अजित नवले यांच्यासह सर्व प्रमुख विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आणि आयुक्त, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.मुख्यमंत्री म्हणाले, "नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक आहे, कारण तसे केले नाही तर रब्बीची पेरणी त्यांना करता येणार नाही. म्हणून आता ३२ हजार कोटींच्या पॅकेज वितरण याला प्राधान्य आहे. पूर्व अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना पॅकेजच्या माध्यमातून ३२ हजार कोटी रूपये मदत दिली जात आहे. आत्तापर्यंत ८००० कोटी रुपये खात्यात दिले गेले आहेत. या आठवड्याअखेर १८,५०० कोटी रुपये दिले जाणार असून पंधरा दिवसात ९० टक्के शेतकऱ्यांच्या थेट खात्यात रक्कम जाईल या दृष्टीने तरतूद केली असून निर्देश दिले आहेत."मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले," आमच्या जाहीरनाम्यात कर्जमाफीचा निर्णय होता. पण ही तात्कालिक बाब आहे.

दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. कर्जाची वसुली जूनपर्यंत होते, त्यामुळे जूनपर्यंत मुदत आहे. याबाबत आंदोलकांशी झालेल्या सकारात्मक चर्चा झाली असून या भूमिकेशी सर्व नेत्यांनी सहमती दर्शवली आहे.

अन्य विषयांवर पुढच्या आठवड्यात बैठक घेणार आहे "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की कर्जमाफी कशी करायची याबाबत एप्रिलपर्यंत समिती शिफारस करेल शिफारशीच्या आधारावर पुढच्या तीन महिन्यात म्हणजे ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करणार.

नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात आता पैसे देणे आवश्यक असून रब्बीची पेरणी करता यावी, म्हणून आता ३२ हजार कोटींच्या पॅकेज वितरणास प्राधान्य आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 01/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'इंटरनॅशनल अर्बन अँड रिजनल को-ऑपरेशन आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया कार्यक्रम'चा भारतात शुभारंभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : नवी दिल्ली येथे आयोजित अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स फेस्टिव्हल २०२५ दरम्यान "समावेशक, सक्षम व शाश्वत शहरे" या विषयाखाली 'इंटरनॅशनल अर्बन अँड रिजनल को-ऑपरेशन' (IURC) आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया कार्यक्रमाचा भारतात अधिकृत शुभारंभ करण्यात आला.**



या कार्यक्रमासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेला आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी 'आययूआरसी इंडिया किक-ऑफ मिटिंग' या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर सत्रात युरोपियन युनियनचे प्रतिनिधी, राष्ट्रीय भागीदार तसेच सहा भारतीय पायलट शहरे, ज्यामध्ये चेन्नई, पिंपरी चिंचवड, जबलपूर, कटक, गँगटोक आणि लेह यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी शाश्वत शहरी विकासासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधींवर सखोल चर्चा झाली पिंपरी चिंचवड महापालिकेच्या योजनांविषयी दिली माहितीया सत्रात मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रतिनिधित्व करत शहराच्या शाश्वत विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांविषयी माहिती दिली. त्यांनी शहरी नवोपक्रम, सार्वजनिक वाहतूक सुधारणा, हवामान लवचिकता आणि पर्यावरण संरक्षण क्षेत्रातील महापालिकेचे प्रयत्न अधोरेखित केले.

तसेच वाढत्या नागरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या पायाभूत आव्हानांवर मात करण्यासाठी बहुस्तरीय समन्वयाची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. पिंपरी चिंचवड महापालिका सध्या हवामान अनुकूल विकास, हरित गतिशीलता, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा कार्यक्षमतेसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवित आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून महापालिका जागतिक पातळीवरील सर्वोत्तम शहरी धोरणे आत्मसात करण्याच्या दिशेने प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी सांगितले.

चर्चेदरम्यान हवामान अनुकूलता, सर्क्युलर इकॉनॉमी, डिजिटल नवोपक्रम आणि शाश्वत वित्तपुरवठा या सामाईक प्राधान्य क्षेत्रांवर सविस्तर विचारमंथन झाले. युरोप आणि भारतीय प्रतिनिधींनी या भागीदारीला स्मार्ट सिटीज मिशन आणि नॅशनल अर्बन पॉलिसी फ्रेमवर्कशी सुसंगत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

सत्राचा समारोप संयुक्त कृती आराखडे, क्षमता-वृद्धी उपक्रम आणि तांत्रिक देवाणघेवाण सुरू करण्याच्या वचनबद्धतेने झाला. या उपक्रमाने युरोप–भारत सहकार्याच्या एका नव्या पर्वाची सुरुवात केली आहे.

यावेळी व्हिक्टोरिया कैडालोवा (कार्यक्रम व्यवस्थापक, युरोप सर्व्हिस फॉर फॉरेन पॉलिसी इन्स्ट्रुमेंट्स, बँकॉक), लुट्झ कोप्पेन (धोरण अधिकारी, डायरेक्टरेट जनरल फॉर रिजनल अँड अर्बन पॉलिसी), पाब्लो गांदारा (टीम लीडर, आययूआरसी आशिया आणि ऑस्ट्रेलाशिया), तसेच स्मिता सिंग (वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक, युरोप प्रतिनिधीमंडळ) आदी उपस्थित होते.

# सौर ऊर्जेच्या माध्यमातून महापालिकेची विजेच्या बिलात तब्बल 5 कोटींची बचत!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित ऊर्जेकडे वाटचाल करत सौर ऊर्जेच्या माध्यमातून ऊर्जास्वावलंबनाचा नवा टप्पा गाठला आहे. महापालिकेने स्वमालकीच्या विविध इमारतींवर सौर यंत्रणा (सोलर रुफटॉप) कार्यान्वित केल्या असून, याद्वारे प्रतितास ३ मेगावॅट क्षमतेची वीज तयार होत आहे.**



यामुळे महापालिकेच्या वीजबिलात तब्बल ५ कोटी ९१ लाख रुपयांची बचत झाली आहे.महापालिकेने पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी करत स्वमालकीच्या इमारतींवर सौर यंत्रणा उभारली आहे. यामध्ये पिंपरी येथील महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, शाळा, स्मशानभूमी, जलतरण तलाव, नाट्यगृह, बॅडमिंटन हॉल, रुग्णालये अशा विविध ८६ ठिकाणी सौर पॅनेल्स महापालिकेने बसवले आहेत.

याद्वारे सप्टेंबर २०२५ पर्यंत ५९ लाख १७ हजार ११२ युनिट्स वीज निर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून आर्थिक बचतीबरोबरच शहराच्या पर्यावरणपूरक वाटचालीला चालना मिळत आहे.

सौर ऊर्जेच्या वापरामुळे महापालिकेच्या वीज खर्चात मोठी घट झाली आहे.

भविष्यातील ऊर्जेची गरज लक्षात घेऊन महापालिकेने आणखी १३ ठिकाणी ४५० किलोवॅट क्षमतेच्या सौर यंत्रणेचे काम हाती घेतले असून, ते प्रगतीपथावर आहे. याशिवाय ५८ ठिकाणी ४ मेगावॅट क्षमतेची सौर प्रणाली उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या प्रकल्पामुळे अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर होऊन पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांवरील ताण कमी होईल आणि स्वच्छ व पर्यावरणपूरक वाटचालीला गती मिळेल.

**प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये -**

१. प्रकल्पाची क्षमता: ३ मेगावॅट/प्रतितास

२. एकूण तयार युनिट्स वीज: ५९ लाख १७ हजार ११२ (सप्टेंबर २०२५ अखेर)

३. वीजबिलामध्ये बचत:

५ कोटी ९१ लाख ७६ हजार ११२ रुपये४. नियोजित प्रकल्प क्षमता: ४ मेगावॅटपिंपरी चिंचवड महापालिकेसाठी सध्या आवश्यक असणारी विजेची गरज वेस्ट टू एनर्जी व सोलर एनर्जी यांसारख्या अपारंपरिक ऊर्जास्त्रोतांचा प्रभावीपणे वापर केला जात आहे. यातून आर्थिक बचतीसह आगामी काळात पिंपरी चिंचवड महापालिकेस 'नेट झिरो' बनवण्याचा महापालिकेचा मानस आहे.

— प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 01/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# आता नियमभंग करणाऱ्यांना 'आरटीओ'त जाण्याची गरज नाही

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : वारंवार वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालक, मालकांना नोटीस पाठवून उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) दंड भरवा लागत होता. मात्र, परिवहन विभागाने ऑनलाईन दंड भरण्याची सुलभ सुविधा उपलब्ध करून दिली आहे.**




त्यामुळे आता वाहनचालकांना आरटीओ कार्यालयात जाण्याची गरज भासणार नसल्याने दिलासा मिळणार आहे.परिवहन विभागाच्या आरटीओ विभागामार्फत रस्ता सुरक्षा पथकांमार्फत शहरातील विविध ठिकाणी वाहतूक तपासणी मोहीम राबविण्यात येते.

या मोहिमेदरम्यान नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांना अतिवेगात वाहन चालवणे, विनाहेल्मेट – सीटबेल्ट प्रवास, मद्यसेवन करून वाहन चालविणे, विनापरवाना किंवा वाहतूक नियमांचे उल्लंघन करून वाहन चालविणाऱ्यांवर तपासणी अधिकाऱ्यांकडून ऑनलाईन दंडात्मक चलनाद्वारे कारवाई करण्यात येते.

मात्र, यामध्ये ज्या वाहनचालकांवर तीन किंवा त्यापेक्षा जास्त चलन असल्यास तसेच वेळेत दंड न भरल्यास नोटीस पाठवून त्यांना प्रत्यक्षात आरटीओत उपस्थित राहून दंड भरावा लागत होता.

त्याशिवाय, वाहनाचे पुढील काम होत नसल्याने वाहनचालकांची आरटीओत गर्दी होत असे.

ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी परिवहन विभागाने डिजिटल माध्यमाचा अवलंब स्वीकारला आहे.

संबंधित वाहनचालकाला मिळालेली ई-चलनाची नोटीस https://echallan.parivahan.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन भरता येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे.

# शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने 84 लाखांची फसवणूक

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत ८४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.**




शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सिंहगड रस्ता भागातील एका ज्येष्ठ नागरिकाची सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ नागरिकाची ३३ लाख १९ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर शेअर बाजारातील गुंतवणुकीबाबत संदेश १५ जुलै रोजी संदेश पाठविला होता.

चोरट्यांनी त्यांना गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून जाळ्यात ओढले. त्यानंतर चोरट्यांच्या खात्यात ज्येष्ठ नागरिकाने वेळोवेळी ३३ लाख १९ हजार रुपये जमा केले.

पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी त्यांना परतावा दिला नाही. परतावा न मिळाल्याने ज्येष्ठाने चोरट्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा चोरट्यांनी प्रतिसाद दिला नाही.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उल्हास कदम तपास करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 01/11/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिका सेवेतून 22 जण सेवानिवृत्त!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेत अनेक वर्षे जबाबदारीने, प्रामाणिकपणे कामकाज केलेले आहे. आपल्या कार्यकर्तृत्वाने महापालिकेचा नावलौकिक वाढविणा-या या अधिकारी,कर्मचाऱ्यांचा आदर्श कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी घ्यावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले**



तसेच सेवानिवृत्तांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृह येथे झालेल्या कार्यक्रमात माहे ऑक्टोबर २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारे १२ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले १० अशा एकूण २२ कर्मचा-यांचा अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अभयचंद्र दादेवार,मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त दशरथ कांबळे,कार्यकारी अभियंता तथा कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस अभिमान भोसले, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, प्रशासन अधिकारी उमा दरवेश, कामगार कल्याण विभागातील लिपिक माया वाकडे, तसेच महानगरपालिकेचे कर्मचारी आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. माहे ऑक्टोबर २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता देवन्ना गट्टूवार, उपअभियंता महेंद्रसिंह ठाकूर, लेखाधिकारी सुरेंद्र देशमुखे, मुख्याध्यापिका शाहिदा सय्यद, सुनिता माने, कार्यालय अधिक्षक जयश्री कुदळे, सिस्टर इनचार्ज हेमलता रायकर, मिना संकपाळ, शिपाई सुभाष भोईर, वसंत बेल्हेकर, मुकादम धनंजय गंगावणे, मजूर भरत डाऊल यांचा समावेश आहे. तर स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता साळवे, सफाई कामगार जयश्री मलकेकर, शारदा लोळगे, लिलाबाई बागडी, पुष्पा जगताप, महेश भोसले, हिराबाई थेंडे, गीता चावरिया, कचरा कुली अरुण पवार आणि गटर कुली अजिनाथ तेलंगे यांचा समावेश आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक आणि आभार किरण गायकवाड यांनी मानले.

# महापुरुषांच्या देशसेवेचा आदर्श घेत महानगरपालिकेची वाटचाल सुरु

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी – माजी पंतप्रधान भारतरत्न, इंदिरा गांधी यांनी देशाच्या विकास, स्वावलंबन आणि प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले तर माजी उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा पाया घालून अखंड भारताची निर्मिती केली, या थोर व्यक्तींच्या देशसेवेचा आणि सामाजिक कार्याचा आदर्श घेत महापालिका कार्य करत आहे, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.**



माजी पंतप्रधान, भारतरत्न इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त तसेच माजी उपपंतप्रधान लोहपुरूष,सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यावेळी त्या बोलत होत्या. या अभिवादन कार्यक्रमास नगरसचिव मुकेश कोळप, उपआयुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि कर्मचारी महासंघाचे मनोज माछरे यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागातील कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते. माजी पंतप्रधान भारतरत्न इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी "राष्ट्रीय संकल्प दिन" म्हणून तर सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती "राष्ट्रीय एकता दिन" म्हणून साजरी करण्यात येते.

यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी "आम्ही अशी शपथ घेतो की, देशाची एकता, अखंडता आणि सुरक्षा अबाधित राखण्यासाठी आम्ही स्वतःला समर्पित करू आणि देशातील बांधवांपर्यंत हा संदेश पोहोचविण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू,सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दूरदृष्टीने आणि कार्यामुळे शक्य झालेल्या देशाच्या एकतेच्या भावनेतून आम्ही ही शपथ घेत आहोत तसेच देशाची अंतर्गत सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आपले योगदान देण्याचा आम्ही संकल्प करतो." अशी राष्ट्रीय एकतेची सामुहिक शपथ घेतली.जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले. या दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्यातून आपण सर्वांनी प्रेरणा घ्यावी, देशाच्या ऐक्य, प्रगती आणि सामाजिक सलोख्यासाठी सातत्याने कार्यरत राहावे, हेच खरे त्यांना अभिवादन ठरेल असे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर म्हणाल्या.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

# लवकरच....!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734